# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- ०७/०३/२०१८

## दारू विक्रेत्यांना शिक्षा

- *प्रथमवर्ग न्यायालय आरमोरी यांचा महत्वपुर्ण निकाल...*

दिनांक २०/०९/२०१६ रोजी आरमोरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना माहिती मिळाली की, गाढवी नदीचे पलीकडून हातभट्टी मोहाची दारू विक्री करीता येत आहे अनुषंगाने पोलीस फोर्स पाठवून शहानिशा केली असता तेथे दोन इसम हातात कॅन मध्ये मोहफुलाची दारू घेवून येत असतांना दिसले त्याना अटक करून त्यांचेवर आरमोरी पोलीस ठाणे येथे अपराध क्रं. ६१२९/२०१६ महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ) अन्वये आरोपी क्रं. १) सुधीर ऊर्फ ईल्ली यशवंत राऊत वय-३५ वर्षे रा. रामाळा व आरोपी क्र. २) राजु रामचंद्र नेवारे वय- ३२ वर्ष रा. रामाळा दोघावर गुन्हा दाखल झाला सदर गुन्हयात दोघांनाही अटक करण्यात आली सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली आरमोरी पोलीस ठाणेचे पोलीस नाईक २०५९ दिवाकर देवराव होळी यांनी गुन्हयाचा तपास करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले सुनावणी दरम्यान न्यायालयाने साक्षिदार तपासले व योग्य पुराव्याचे आधारे दि. ०३ मार्च २०१८ रोजी आरोपी क्र. १) सुधीरउर्फ ईल्ली यशवंत राऊत वय- ३५ वर्षे रा. रामाळा व आरोपी क्र. २) राजु रामचंद्र नेवारे वय- ३२ वर्ष रा. रामाळा या दोन्ही आरोपीतांना महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ) अन्वये ३ वर्ष साधी कैद व प्रत्येकी २५,०००/- हजार रूपये द्रव्यदंडाची

शिक्षा सुनावण्यात आली आरोपीने दंड न भरल्यास प्रत्येकी ६ महिण्याचे शिक्षा लागेल सुनावले.

आरमोरी प्रथमवर्ग न्यायालायाचे न्यायाधिश संजय एच. आटकारे यांनी सुनावला या प्रकरणात सरकारतर्फे अभियोक्ता म्हणून सुरेश एन. रासेकर यांनी काम पाहीले तसेच आरोपीतांचे वकील म्हणून वाय. एस. तोगे यांनी पाहीले तसेच आरमोरी प्रथमवर्ग न्यायालयात पैरवी अधिकारी म्हणून सहा. पोलीस उपनिरीक्षक १०३ नरहरी खोबरागडे तसेच कोर्ट मोहरर म्हणून पोलीस नाईक ३२६ संतोष दुपारे यानी काम पाहिले.